# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक ७ मार्च, २०२५
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

(१) **उप मुख्यमंत्री तथा नियोजन मंत्री** : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२४-२०२५ हे प्रकाशन सभागृहासमोर ठेवतील.

(२) **जलसंपदा मंत्री (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ)** : कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचे सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षांचे वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **सर्वश्री. कृष्णा खोपडे, विकास ठाकरे, विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, अस्लम शेख, अमित झनक, संजय मेश्राम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"नागपूर सुधार प्रन्यास अंतर्गत अभिन्यासातील अनेक भूखंडावर असलेले प्लेग्राउन्ड / पार्कचे आरक्षण, या आरक्षित जागेवर तसेच अनेक ठिकाणी ओपन स्पेसवर अंदाजे ४०-५० वर्षापासून घरांचे झालेले बांधकाम, तसेच या ठिकाणी आमदार, खासदार व शासकीय निधीतून झालेली विकासकामे, गुंठेवारी अंतर्गत नियमितीकरणास पात्र असणे, परंतु नियमितीकरण अद्याप करण्यात आले नसणे, सदर आरक्षण वगळून बांधकामे नियमित करण्यासाठी नागपूर सुधार प्रन्यासने आतापर्यंत केलेली कारवाई, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे किंवा कसे, मात्र अद्याप यासंदर्भात कसल्याही प्रकारे न्यायनिवाडा होत नसल्यामुळे निवासीयांची होत असलेली कुचंबणा, यावर योग्य मार्ग काढून हजारो घरमालकांना दिलासा देण्यासाठी बांधकाम नियमितीकरण करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री.रईस शेख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"भिवंडी शहराची लोकसंख्या १७ लाखाच्या वर असून या ठिकाणी अनेक कंपन्या, छोटे मोठे उद्योगधंदे सुरु असणे, शहरातील वाहतूकीची समस्या दिवसेंदिवस वाढत असल्याने उद्योजकांना, स्थानिकांना, विद्यार्थ्यांना अत्यंत त्रास नाहक सहन करावा लागत असूनही प्रशासनाकडून कोणतीही दखल घेण्यात न येणे, त्यामुळे भिवंडी शहराच्या विकासाच्या दृष्टीने रिंगरोड हा अतिशय महत्वाचा असणे, भिवंडी बाह्यवळण ६० मी. रस्त्याचे काम प्रस्तावित असून MMRDA प्राधिकरणाच्या दिनांक २७ जून, २०२४ रोजीच्या बैठकीत भिवंडी बाह्यवळण रस्त्याच्या प्रकल्पासाठी रु.२०१ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता मिळाली असणे, उक्त रस्ता भिवंडीतील ९ गावांमधून जात असून संयुक्त मोजणीसाठी आवश्यक फी भूमी अभिलेख, ता.भिवंडी यांचेकडे सन २०१६ साली भरणा केलेली असणे, त्यानुषंगाने ९ गावांपैकी ३ गावांची संयुक्त मोजणी झालेली असणे, उर्वरित ६ गावांची मोजणी तेथील स्थानिक नागरीकांच्या विरोधामुळे न होणे, त्यानुसार सदरहू मोजणी प्रलंबित असलेल्या गावांची त्वरीत मोजणी करण्याबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसणे, सदर रस्ता बनविणेकामी सद्य:स्थितीत ६५% भूसंपादन झालेले असून सदर प्रकल्पास फेज वन व फेज टू अश्याप्रकारे टप्प्याटप्प्याने काम सुरु करणेबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता असणे, सदरचा बाह्यवळण रस्ता रिंगरोड झाल्यास भिवंडीकरांची वाहतूकीची समस्या सुटण्यास मदत होणार असणे, सदर रिंगरोडचे काम अद्यापही पूर्ण न होऊ शकल्याने नागरीकांमध्ये शासनाबाबत नाराजीची भावना असणे, उपरोक्त परिस्थितीच्या अनुषंगाने रिंगरोड प्रकल्पास गती मिळणेबाबत MMRDA ला आदेश होण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ७ जानेवारी,२०२५ रोजी भिवंडीचे विधानसभा सदस्य यांनी निवेदनाद्वारे मागणी केलेली असणे, याबाबत शासनाने तातडीची करावयाची उपाययोजना वा कार्यवाही."

**(३) श्रीमती विद्या ठाकूर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"गोरेगाव (पश्चिम) येथील भगतसिंग नगर क्र.१,२ व ३ येथे मुंबई सागरी किनारा प्रकल्पातील उड्डाणपूल येत असणे, सदर उड्डाणपुलामुळे तेथील २००० हून अधिक झोपडीधारक बेघर होत असणे, या सर्व झोपडीधारकांचे गेली ५० वर्षे तेथे वास्तव्य असणे, तेथील नागरिकांचे नोकरी, व्यवसाय, विद्यार्थ्यांची शाळा व महाविद्यालये त्याच अथवा आसपासच्या परिसरात असणे, महानगरपालिकेमार्फत त्यांना नोटीसा बजावण्यात येत असणे, सदर ठिकाणी काही दलालांचा सुळसुळाट सुरु असल्याचे व त्यांच्या मार्फत नागरिकांना घाबरवण्याचे, पैसे उकळण्याचे सत्र सुरु असणे, महानगरपालिकेच्या अधिका-यांकडून कोणतीही ठोस माहिती रहिवाशांना देण्यात न येणे, नागरिकांच्या पुनर्वसनाबाबत तसेच नुकसान भरपाईबाबत सरकारकडून कोणतेच ठोस धोरण निश्चित नसणे, यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरलेले असणे, लोक संभ्रमावस्थेत

असणे, सर्व बाधित नागरिकांचे आहे त्याच ठिकाणी किंवा जवळपासच्या परिसरात पुनर्वसन करण्याची मागणी असणे, याबाबत स्थानिक लोकांमध्ये सरकार विरुध्द पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) डॉ. राहूल पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या निमित्ताने परभणी शहरात त्यांचा भव्य पुतळा उभारण्याची योजना आखण्यात येणे, स्थानिक नागरीकांकडून परभणी येथे "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर" यांचे स्मारक उभारण्याचे काम तात्काळ पूर्ण करण्यात यावे अशी होत असलेली मागणी, "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर" यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी जागा निश्चित करण्यासंदर्भातील ठराव परभणी महानगरपालिकेच्या दि. २६ ऑगस्ट, २०१९ मध्ये झालेल्या बैठकीत संमत करण्यात येणे, पुतळ्यासाठी परभणी शहरातील स्टेडीयम कॉम्प्लेक्स येथील स्टेडीयममध्ये जाणेकरीता असलेल्या मुख्य प्रवेशव्दाराजवळील जागा निश्चित करुन ठराव क्र. २३२ संमत करणे, परंतु सदर जागेवर अनधिकृत बांधकामे असणे, त्यामुळे "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर" यांच्या पुतळ्याच्या उभारणीचे काम अद्यापही सुरु न होणे, परिणामी नागरीकांमध्ये वाढत असलेला तीव्र असंतोष, शासनाने सदर जागेवरील अनधिकृत बांधकामे त्वरीत हटवून पुतळ्यासाठी जागा रिकामी करुन घेण्याची आवश्यकता, शासनाने यासंदर्भात केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(५) सर्वश्री. विनोद अग्रवाल, संजय पुराम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया व गोरेगाव या तालुक्यांमध्ये पांगोली नदीचा प्रवाह वाहत असणे, पांगोली नदीवर गोंदिया व गोरेगाव तालुक्यांमध्ये मृद व जलसंधारण विभागामार्फत विविध ठिकाणी कोल्हापुरी बंधाऱ्यांचे बांधकाम करण्यात आले असणे, उक्त बंधाऱ्यातील पाण्याचा दोन्ही गावातील शेतकरी वर्ग सिंचनाकरीता नियमित वापर करत असणे, पांगोली नदीतील पात्रांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचलेला असल्याने पाण्याचा प्रवाह उथळ झालेला असणे, दरवर्षी पावसाळ्यामध्ये पुराचे पाणी नदी पात्राचे लगतच्या गावांतील घरांमध्ये शिरुन अन्न/धान्याचे नुकसानासह पिकांचेसुध्दा मोठ्या प्रमाणात नुकसान होत असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे, सन २०२२ मध्ये मृद व जलसंधारण विभागाने नदीचे सर्वेक्षण करुन डिपीआर तयार करणे, जिल्ह्यातील नद्यांचे यादीमध्ये पांगोली नदीचा समावेश करण्यात येणे, शासनाच्या नव्या धोरणानुसार नदीचे पुनरुज्जीवन जलसंपदा विभागाकडे वर्ग करण्यात आल्यावर विभागाने उक्त डिपीआरमध्ये त्रुटी काढुन नव्याने डिपीआर तयार करण्याचा प्रस्ताव वरीष्ठांना पाठविण्यात येणे, परंतु अद्यापही सर्वेक्षण करण्यात

आले नसणे, पुरामुळे होत असलेले नुकसान व सर्वेक्षण करण्यास होत असलेल्या दिरंगाईमुळे नागरिकांमध्ये असलेले असंतोषाचे वातावरण त्यावर शासनाचे करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) सर्वश्री. बापूसाहेब पठारे, शंकर जगताप, अमित देशमुख, डॉ.आशिषराव देशमुख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे व पिंपरी चिंचवड शहरातून मुळा-मुठा नदीत थेट मैला पाणी सोडले जाणे, औद्योगिक कारखान्यातील पाण्यामुळे मुळा-मुठाच्या प्रदूषणात वाढ होणे, सदर हानिकारक पाणी हे शेती करण्यासही अयोग्य असल्याने नदी किनारच्या गावातील शेतीही नापिक होणे, प्रदूषणयुक्त पाण्याने शेती केल्याने पिकेही खाण्यास हानिकारक होणे, नदीच्या प्रदूषणामुळे पर्यावरणाचे गंभीर संकट निर्माण झाले असून या पाण्यातील हानिकारक पदार्थांमुळे त्याची गुणवत्ता खराब होणे, यामुळे नदीतील जलचर, मानवी आरोग्य आणि पर्यावरणावर होणारा नकारात्मक परिणाम, नदी किनारच्या गावात डासांच्या प्रमाणात वाढ होणे, तसेच नागरिकांना गंभीर आजार होऊन त्यांचेवर वैद्यकीय खर्चाचा आर्थिक ताण पडणे, या प्रदूषणाला आळा घालणे गरजेचे असणे, यासाठी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सांडपाणी हे शुद्धीकरण प्रकल्पातून प्रक्रिया करूनच नदीत सोडणे आवश्यक असणे, एम.आय.डी.सी. ने देखील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची आवश्यकता, महानगरपालिकेने उभारलेले शुद्धीकरण केंद्र हे पूर्ण क्षमतेने सुरू ठेवणे गरजेचे असणे, परंतु तसे न करता हे प्रकल्प रात्रीच्या वेळेस बंद करून सदरचे पाणी थेट नदीत सोडण्याचे गंभीर प्रकार सातत्याने घडणे, असे करणाऱ्या संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत मा. मंत्री पर्यावरण व सचिव यांना दिनांक ४ फेब्रुवारी, २०२५ रोजी केलेला पत्रव्यवहार, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) सर्वश्री. साजिद पठाण, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, अमिन पटेल, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री विकास ठाकरे, अमित झनक, संजय मेश्राम, अनिल मांगुळकर, हेमंत ओगले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यटन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सन १९६७ पासून अकोला नगरीचे श्रध्दास्थान असलेले शहरातील पुरातन स्थळ व आराध्य दैवत म्हणून मान असलेले ४०० वर्ष जुने शिव मंदिर व श्री राजराजेश्वर मंदिराचा विकास आराखडा अदयापही रखडलेला असणे, तिर्थक्षेत्र दर्जा व "ब" वर्ग दर्जा मिळालेला नसणे, दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी झालेल्या नियोजन समितीच्या बैठकीत तिर्थक्षेत्र ”क” वर्ग दर्जाचा ठराव घेऊनही आजतागायत प्रस्ताव प्रलंबित असणे, दरवर्षी श्रावण महिन्यात तसेच महाशिवरात्रीला कावड यात्रेचे आयोजन केले जात असणे, आठ लाखाहून अधिक बाहेरील जिल्ह्यातून भक्त दर्शनाकरिता येत असणे, लाखो

भाविक येत असतांनाही त्याठिकाणी भाविकांना भक्त निवासस्थान, पोहोच रस्ते, पाणी, विद्युत व आरोग्य इत्यादी सुविधा नसणे, येथे पार्किंगकरिता जागा विकास आराखड्यात आरक्षित करण्यात आलेली असतांनाही जुने शहर पोलिस चौकीची जागा बदलून तेथे पोलिस विभागाने नविन पोलिस चौकी बांधण्याबाबत प्रस्ताव मंजूर करणे, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून विकास आराखड्यात दाखविण्यात आलेल्या पार्किगबाबतचा निर्णय घेण्याची आवश्यकता, उक्त राजराजेश्वर मंदिर परिसराचा विकास करणे गरजेचे असल्याने याकरिता रु. ५१८.६४ कोटीचा श्री राजराजेश्वर मंदिर परिसर व मोर्णा घाट विकासाचा आराखडा तयार असूनही अद्याप मंजूरी देण्यास होत असलेला विलंब, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींकडून सातत्याने होत असलेला पाठपुरावा, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने प्राधान्याने लक्ष घालून श्री राजराजेश्वर मंदिराला “क” वर्ग दर्जा देण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**चार : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (मुख्यमंत्र्यांचे उत्तर)**

**पाच : सन २०२४-२०२५ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा व शेवटचा दिवस).**

(१) गृह विभाग

(२) नगरविकास विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**
**[ चर्चारोध (गिलोटीन) सायंकाळी ०५.३० वाजता ]**

**सहा : शासकीय विधेयक :**

**पुर:स्थापनार्थ, विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२५

**सात : मा.अध्यक्षांचा प्रस्ताव :-**

"संपूर्ण जगात दिनांक ८ मार्च हा दिवस "**महिला दिन**" म्हणून साजरा करण्यात येणे, नारी शक्तीचे प्रेरणास्थान असणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रि जन्मशताब्दी वर्ष राज्य शासनाद्वारे साजरे करण्यात येणे, अहिल्या देवींनी आपल्या कर्तृत्ववान व्यक्तिमत्वाच्या जोरावर राज्य करुन प्रजेवर अतोनात प्रेम करणे, जनसामान्यांच्या हालअपेष्टांचे वर्तमान गोळा करुन त्यांच्या कष्टदशेचे निवारणार्थ विविध कल्याणकारी योजना आखणे, गरीब, दिव्यांग व पीडितांना

अमर्याद दान करणे, अनेक मंदिरांचा जिर्णोध्दार करुन धार्मिक क्षेत्रात भरीव योगदान देणे, शेती, सिंचन, पाणीपुरवठा इ. क्षेत्रात मोलाची भूमिका घेणे, अशा या कर्तृत्ववान मातेचे पुन:पुन्हा पुण्यस्मरण करुन त्यांच्या भूमिकेचे प्रतिबिंब सध्याचे केंद्र व राज्य शासन राबवित असलेल्या महिला धोरणात आढळून येणे, राज्य शासनामार्फत महिलांचे सबलीकरण तसेच त्यांची शैक्षणिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात भरभराट व्हावी यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येणे, महिलांचा क्रीडा, पर्यटन, बँकिंग, वैद्यकीय सेवा, संगणक, विज्ञान, गिर्यारोहण अशा विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सहभाग असणे व त्याद्वारे त्या यशाची व प्रगतीची शिखरे पार करीत असणे, महिलांचा सामाजिक व आर्थिक दर्जा ऊंचावण्याच्या दृष्टीने शासन महिला विकासाच्या विविध योजना राबवित असणे, महिला व बालकांवरील अन्याय व अत्याचाराविरुध्द विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना करुन न्यायाचे धोरण कार्यान्वित करुन त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, महिला व बालकांवर होत असलेल्या अन्याय, अत्याचाराविरुध्द जनजागृती करुन त्यांच्यासाठी विकास व सुरक्षा याद्वारे केलेल्या प्रयत्नातून साध्य झालेल्या यशाचा आढावा घेऊन पुढील कार्यक्रमाची दिशा ठरविण्याची व एकजुटीने कृती कार्यक्रम वृध्दींगत करण्याची आवश्यकता, तसेच महिला, मुली व बालकांच्या विकासासाठी समाज व शासन वचनबध्द असून त्याबाबत एकजुटीने प्रयत्न करुन व संकल्प करुन महिलांना न्याय देण्याची आवश्यकता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रि जन्मशताब्दी वर्ष साजरे करताना त्यांचे प्रती महिलांच्या सर्वांगिण विकासाच्या कटिबद्धतेसाठी समस्त जनतेची कृतज्ञपणाची भावना विचारात घ्यावी."

**आठ : (गुरुवार, दिनांक ६ मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, अर्जुन खोतकर, अब्दुल सत्तार, सुरेश भोळे, सुधीर मुनगंटीवार, चेतन तुपे, सुरेश धस, दिपक केसरकर, अनिल पाटील, प्रशांत बंब, डॉ.तानाजी सावंत, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री नारायण कुचे, रमेश बोरनारे, राजकुमार बडोले, देवराव भोंगळे, राजेश क्षिरसागर, प्रताप पाटील-चिखलीकर, अभिमन्यू पवार, विजय शिवतारे, धर्मराव आत्राम, प्रकाश भारसाकळे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री चंद्रकांत नवघरे, चैनसुख संचेती, मंगेश कुडाळकर, दिलीप बनकर, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रकाश सुर्वे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रवीण दटके, किशोर पाटील, नरेंद्र भोंडेकर, मोहन मते, दौलत दरोडा, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री राजू तोडसाम, प्रकाश सोळंके, संजय गायकवाड, राजेश वानखडे, संतोष बांगर, संजय बनसोडे, किसन वानखेडे, दिलीप लांडे, सत्यजित देशमुख, विनोद अग्रवाल, चंद्रकांत सोनवणे, दिलीप वळसे-पाटील, संभाजी निलंगेकर-पाटील, संतोष दानवे, राजेश पवार, शिवाजी कर्डिले, सचिन कल्याण-शेट्टी, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री रमेश कराड, रत्नाकर गुट्टे, डॉ.संजय कुटे,**

**सर्वश्री प्रताप अडसड, राणाजगजितसिंह पाटील, बबनराव लोणीकर, तान्हाजी मुटकुळे, किसन कथोरे, सर्वश्रीमती मोनिका राजळे, सीमाताई हिरे, देवयानी फरांदे, सर्वश्री रविंद्र चव्हाण, संजय केळकर, हरिश पिंपळे, उमेश यावलकर, सुमित वानखेडे, श्रीमती श्रीजया चव्हाण, सर्वश्री प्रशांत ठाकूर, महेश बालदी, सर्वश्रीमती सई डहाके, स्नेहा दुबे, सुलभा गायकवाड, सर्वश्री योगेश सागर, भिमराव तापकीर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री अतुल भातखळकर, शंकर जगताप, कृष्णा खोपडे, विक्रम पाचपुते, करण देवतळे, गोपीचंद पडळकर, अमल महाडिक, राहुल आवाडे, महेश लांडगे, चरणसिंग ठाकूर, अमोल जावळे, दिलीप बोरसे, डॉ. राहुल आहेर, ॲड. राहुल ढिकले, श्री. सुभाष देशमुख, डॉ. सुरेश खाडे, डॉ. अतुल भोसले, ॲड. राहुल कुल, सर्वश्री काशिराम पावरा, समीर मेघे, समीर कुणावार, विजय रहांगडाले, किर्तीकुमार भांगडिया, डॉ.आशिष देशमुख, सर्वश्री विनोद अग्रवाल, संजय पुराम, किशोर जोरगेवार, राजेश बकाने, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री श्याम खोडे, केवलराम काळे, भीमराव केराम, जितेश अंतापुरकर, सिध्दार्थ शिरोळे, अनुपभैय्या अग्रवाल, राजेश पाडवी, श्रीमती अनुराधा चव्हाण, सर्वश्री शिवाजी पाटील, संजय उपाध्याय, चंद्रकांत पाटील, सुनिल शेळके, निलेश राणे, राजेंद्र यड्रावकर-पाटील, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री शरद सोनवणे, किरण सामंत, आशुतोष काळे, हिरामण खोसकर, राजेश विटेकर, राजू कारेमोरे, शेखर निकम, सचिन पाटील, संग्राम जगताप, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"शेतकरी सुखी, तर राज्य सुखी” हा मंत्र व शेतकऱ्यांच्या हिताचा विचार केंद्रस्थानी ठेऊन राज्यातील बळीराजाला स्थैर्य देणे, त्याला बळकट करणे आणि शेतीला नैसर्गिक आपत्तीपासून वाचविण्यासाठी शाश्वत उपाययोजना करणे हे ध्येय समोर ठेऊन आणि नारी शक्ती व युवा शक्तीला प्राधान्य देऊन राज्यात विविध योजना गतीमानतेने कार्यान्वित करण्याचा, जन कल्याणाचा वसा घेतलेल्या या शासनाचा प्रयत्न असणे, “नमो शेतकरी महासन्मान निधी” योजनेत राज्यातर्फे प्रती शेतकरी ६ हजार रुपये देण्यात येत असणे, केवळ १ रुपयात पिक विमा देण्यात येत असून त्यायोगे महाकृषी विकास अभियान राबविण्यात येत असणे, नुकसानीचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी ई-पंचनामा प्रणाली तसेच ई-फेरफार, संगणकीय सातबारा उतारे यासारख्या योजना राबऊन पारंपारिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली असणे, शेतकऱ्यांचा आर्थिक आधार बळकट करण्यासाठी "मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट)” प्रकल्प कार्यान्वित केला असणे, शेतमालाला बाजारपेठ मिळऊन देण्यासाठी शेतकरी ते खरेदीदार अशी मूल्य साखळी विकसित करण्यात आली असणे, "मागेल त्याला शेततळे" या योजनेला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद लाभल्याने त्यात फळबागा, ठिंबक सिंचन, शेडनेट, हरितगृहे, आधुनिक पेरणी यंत्रे, कॉटन श्रेडर यांचा समावेश करण्यात आला असणे, शेतक-यांसाठी महत्वाचे असणारे वैनगंगा पैनगंगा नदीजोड प्रकल्प, मराठवाडा वॉटर

ग्रीड, POCRA टप्पा-२ तसेच, जलयुक्त शिवार टप्पा-२ यासारखे महत्वाकांक्षी प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याचे प्रयोजन असणे, मविआकडून शेतक-यांना नैसर्गिक आपत्तीसाठी नुकसान भरपाई म्हणून केवळ ८,७०१ कोटी निधी वितरित करण्यात आला असताना विद्यमान शासनाच्या काळात हाच निधी १६,३०९ कोटी वितरित केला असणे, राज्यातील शेतकरी बांधवांना दिवसा वीज मिळावी याकरिता राज्यातील सर्व सब स्टेशनच्या परिसरात सोलर पार्क उभारण्याचे प्रयोजन असणे, याद्वारे निर्माण झालेल्या विजेचा वापर कृषी फिडर्सना पुरवठा करण्यासाठी अपेक्षित असणे, राज्यात जगातील सर्वात मोठा ९ हजार मेगावॅट क्षमता असलेला डिस्ट्रब्युटेड रिन्युएबल एनर्जी प्रकल्प उभारण्यात येत असणे, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे ५० टक्के कृषी फिडर्स सौरऊर्जेवर चालविणे शक्य होणार असणे, विद्यमान शासनाने शेतक-यांना सिंचनासाठी “मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना” जाहिर केली असणे, या शासनाने “मागेल त्याला सौरकृषी पंप योजना” सुरु केली असल्याने शेतक-यांना केवळ १० टक्के रक्कम भरुन सौर पॅनल्स व पंपासहित सर्व सिंचन सुविधा प्राप्त होणे, दलित आणि आदिवासी शेतकऱ्यांना तर ही रक्कम केवळ ५ टक्के भरावी लागणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे पांदण रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता “मातोश्री पांदण रस्ते योजना” शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, या शासनाच्या काळात २७ सिंचन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असणे, परिणामी विशेषतः मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना वर्षातून एकापेक्षा जास्त पिके घेणे शक्य झाले असणे, राज्यात जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे इ. योजना एकत्रितपणे राबविल्याने केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने जाहिर केलेल्या भारतातील जलाशयांच्या गणनेत महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आला असल्याचे निदर्शनास येणे, हे अभियान देशातील अन्य राज्यांसाठी एक आदर्श व पथदर्शी झाले असणे, कर्जबाजारी शेतक-यांना आधार देऊन कर्जमुक्त करण्यासाठी “महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना” सुरु करण्यात आली असणे, कांद्याला योग्य भाव मिळावा याकरीता कांद्याचे दर ठरविण्याचे अधिकार केंद्राच्या ग्राहक संरक्षण मंत्रालयाने स्वतःकडे ठेवले असणे, तूर हे जिरायती शेतक-यांचे पिक असून ते नैसर्गिक आपत्तीत तग धरणारे, कमी खर्चाचे व आंतरपिक पध्दतीने घेता येणारे असल्याने त्याची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रोत्साहन देण्याची आवश्यकता, कापूस लागवड ते वेचनी यातील बहुतांश कामे मंजुरांऐवजी यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून करणे आवश्यक असून हमी भावाने कापूस खरेदीसाठी सीसीआयने उघडलेल्या केंद्राची संख्या वाढविण्याची आवश्यकता, किंमत स्थिरीकरण योजनेंतर्गत नाफेडने २.२२ लाख मे.टन व एनसीसीएफ अंतर्गत ०.३५ लाख मे. टन कांदा खरेदी केला असणे, हमीभावाने कापूस खरेदीसाठी सी.सी.आयने राज्यात १२१ खरेदी केंद्रे मंजूर केली असणे, कापूस प्रक्रिया उद्योगातील

सर्व घटकांना काही सवलती देण्याची आवश्यकता, कापूस, सूत, कापड निर्यातीच्या संधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, १२ व्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांचीही गरज भागविण्यासाठी कापूस पिकाचा समावेश करण्यात आला असणे, कापूस आधारित पिक पध्दतीस चालना देणे, कापूस पिकात एकात्मिक किड व्यवस्थापनास चालना देणे, अधिक लांब धाग्याच्या कापसांच्या वाणांची प्रात्यक्षिके आयोजित करून कापूस उत्पादकास चालना देण्याचे या शासनाचे धोरण असणे, कापसासाठी ५०० व सोयाबीन साठी २७० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, धानाला २० हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय या शासनाने घेतल्याने त्याचा ६ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळणे, 'नारीशक्ती दुत अॅप' हे क्रांतिकारी अॅप्लीकेशन शासनाने सुरु केल्याने ते गरजू महिलांना ओळखण्यासाठी व सक्षम करण्यासाठी उपयुक्त ठरत असणे, राज्यातील युवकांना स्पर्धेच्या युगात शक्तीशाली स्पर्धक म्हणून उभे राहता यावे याकरिता युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली असणे, युवकांना विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याच्या दृष्टीने त्यांना वसतीगृहाची, निवासाची कुठेही अडचण येऊ नये या उद्देशाने राज्यातील ६ महसूल विभागात १०० युवक-युवतींसाठी युवा वसतीगृह उभारण्यास मान्यता देण्यात आली असणे, राज्यात पर्यटनाला चालना देण्यासाठी शाश्वत पर्यटन धोरण आखण्यात येत असणे, राज्यातील ५० नवीन पर्यटन स्थळांची निवड करून त्या ठिकाणी थीम पार्क, अॅडव्हेंचर स्पोर्ट, शॉपिग मॉल, वॉटर मॉल आणि निवास व्यवस्था करण्यात येत असणे, बुलढाणा येथील लोणार, अंजिठा-वेरुळ, कळसूबाई, त्र्यंबकेश्वर तसेच कोकणातील सागरी किल्ल्यांच्या ठिकाणी पर्यटकांसाठी उच्च दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यात येत असणे, सातारा येथील शिवसागर जलाशय, भंडाऱ्यातील गोसीखुर्द जलाशय तसेच जळगाव येथील वाघूर जलाशय येथे नाविन्यपूर्ण जलपर्यटन प्रकल्प राबविण्यात येत असणे, कोकणातील पर्यटनास चालना देण्यासाठी शिवकालीन ३२ गडकिल्ल्यांचे नुतनीकरण व संवर्धन करण्याचे प्रस्तावित असणे, राज्यातील पर्यटकांना व भाविकांना योग्य दरामध्ये उत्तम व सुरक्षित सुविधा पुरविण्यासाठी श्रीनगर, जम्मु काश्मीर आणि अयोध्या येथे महाराष्ट्र भवन बांधण्याचा निर्णय घेतला असणे, राज्यात शेतकरी कर्जमुक्त व सधन होऊन शेतकरी, शेतमजुर, महिला व युवकांना बळकट करण्यासाठी, पर्यटनाला चालना मिळण्यासाठी व लोक कल्याणकारी आणि गतीमान राज्य निर्माण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**नऊ : (गुरुवार, दिनांक ६ मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. सुनिल प्रभू, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पाटील, दिलीप सोपल, अमीन पटेल, रोहित पवार, अजय चौधरी, अमित देशमुख, उत्तमराव जानकर, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, संदिप क्षिरसागर, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री बापूसाहेब पठारे, सुनिल राऊत, अमित झनक, नारायण पाटील, संजय पोतनीस, विकास ठाकरे, अभिजीत पाटील, नितीन देशमुख, शिरीषकुमार नाईक, राजू खरे, वरुण सरदेसाई, संजय मेश्राम, अनंत (बाळा) नर, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री हारुन खान, साजिद खान पठाण, महेश सावंत, हेमंत ओगले, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, गजानन लवटे, अनिल मांगुळकर, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, प्रविण स्वामी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"जुलै, २०२४ मध्ये राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना लागू करणे, सदर योजनेमध्ये तब्बल २ कोटी ६३ लाख लाडक्या बहिणींची नोंदणी करणे व त्यांना रु. १५००/- दरमहा अनुदान देण्यास सुरुवात करणे, योजनेच्या निकषांचे उल्लंघन करुन गैरफायदा घेतलेल्या लाडक्या बहिणींच्या अर्जांची छाननी माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये सुरु करणे, अनेक बहिणींनी स्वतःहून अर्ज मागे घेणे व लाखों बहिणींचे अर्ज छाननीमध्ये बाद करण्यात येणे, प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) गणपतीच्या मूर्तीवर असलेली बंदी, सदर बंदीमुळे माघी गणेश जयंतीच्या मूर्तींच्या विसर्जनाची झालेली कोंडी, अद्यापही माघी गणपतींच्या मूर्तींचे विसर्जन न झाल्यामुळे भाद्रपद महिन्यातील गणेश मूर्तींच्या (पीओपी) विसर्जनाच्या आखलेल्या उपाययोजनांवर प्रश्न निर्माण होणे, पीओपी व्यतिरिक्त अन्य पर्याय उपलब्ध नसल्यामुळे गणेश भक्त व मूर्तीकार यांच्यामध्ये पसरलेले चिंतेचे वातावरण, मुंबई महानगर प्रदेशातील रस्ते वाहतूक, मेट्रो रेल्वे या सार्वजनिक वाहतूक सेवा अपुऱ्या असल्यामुळे ‘केबल कार’ वाहतूक सेवा सुरु करण्यासाठी आराखडा तयार करणे, राज्यातील धार्मिक स्थळांना जोडण्यासाठी शक्तीपीठ मार्ग शासनाने आखणे, सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, राज्यातील शहरी तसेच ग्रामीण भागातील रस्त्यांची झालेली दुरावस्था, पावसाळ्यापूर्वी सदर रस्ते वाहतूकीसाठी योग्य करण्याची आवश्यकता, राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील अनेक तरुण बेरोजगार असणे, त्यांना रोजगार उपलब्ध करण्याची आवश्यकता, राज्यातील द्राक्ष बागायतदारांचे कमी भावामुळे झालेले नुकसान, महाशिवरात्री हा दिवस द्राक्ष दिन म्हणून साजरा करून राज्यातील शेतकऱ्यांना हातभार लावण्याची आवश्यकता, राज्यात राजरोसपणे डान्सबार मोठ्या प्रमाणावर सुरु असणे, पोलिसांचे डान्सबारवर बंदी आणण्यास जाणीवपुर्वक होत असलेले

दुर्लक्ष, राज्यात मागेल त्याला सौर पंप योजनेतील जाचक अटींमुळे अनेक शेतकरी सदर योजनेपासून वंचित असणे, राज्यात विविध समाजांसाठी १८ महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात येणे, परंतु त्यांना निधी न दिल्यामुळे त्यांची कामे प्रत्यक्षात सुरु न होणे, सध्याचे सरकार शेतकऱ्यांच्या बाबत गंभीर नसल्याचे निदर्शनास आले असून निवडणूकीपुर्वी शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीची घोषणा करुनही अद्याप कर्जमाफीबाबत कोणताही निर्णय घेतलेला नसणे, तसेच विदर्भातील धान, सोयाबीन, कापूस इत्यादी पिकांना बाजारभाव मिळत नसणे, इतर पिकांना हमीभाव मिळण्याची गरज असणे, तसेच राज्यातील अनेक रस्त्यांची विकासाच्या नावाखाली अत्यंत दुरावस्था झाली असल्याने या रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाणात वाढ झालेली असणे, रस्ते अपघातांमुळे मागील काही महिन्यांपासून अनेक बळी जाणे व अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे वाहनातून प्रवास करणाऱ्या वाहतुकदारांना जीव मुठीत ठेवून प्रवास करावा लागत असणे या सर्व बाबींमुळे राज्यातील शेतकरी, महिला वर्ग व सर्वसामान्य जनतेत असंतोष पसरला असून याबाबत राज्य शासनाने करावयाची उपाययोजना व करावयाची कार्यवाही."

**अशासकीय कामकाज**

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**दहा : अशासकीय विधेयके :-**

**पुरःस्थापनार्थ :**

(१) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.महेश लांडगे, वि.स.स. यांचे**

(२) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०२५ - **सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

(३) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

(४) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र जमीन-महसूलाच्या माफीबाबत (क्रमांक-१) (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

(५) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

(६) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र धर्मांतर बंदी विधेयक, २०२५ - **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

(७) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र हिंसाचार व लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

(८) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र चिकित्सालयीन आस्थापना (नोंदणी व विनियमन) विधेयक, २०२५ - **सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

(९) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

(१०) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**अकरा : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक ४ मार्च, २०२५ रोजी बॅलटव्दारे काढण्यात आलेल्या अशासकीय ठरावांच्या सूचना) (क्रमांक १ ते ३)**

**(१) डॉ. विश्वजीत कदम, वि.स.स. यांचा ठराव क्र. ९०**

"पुणे महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांच्या पुनर्बांधणीसंदर्भात शासनाचे असलेले उदासीन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात वाडे कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच वाड्यांच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यामुळे पुणे महानगरपालिका क्षेत्राकरीता मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरीकांची असलेली मागणी, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(२) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांचा ठराव क्र. १३०**

"महाराष्ट्र राज्याला ७२० कि.मी.चा समुद्रकिनारा लाभलेला असून तो मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना स्पर्शून जातो, सदर जिल्ह्यातील जनतेचे मासेमारी हे पारंपारीक प्रमुख उत्पन्नाचे व जीविताचे साधन असताना राज्यशासनाचे मत्स्य विद्यापीठाचे मुख्यालय नागपूर येथे असणे या जिल्ह्यांना सोईचे ठरत नसल्यामुळे मत्स्य विद्यापीठाचे मुख्यालय कोकणात असावे अशी शिफारस मा.खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेली आहे. त्या

शिफारसीची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे"

**(३) डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांचा ठराव क्र. २७**

"राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गमवावे लागणे, राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत असणे, हे अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नसणे, या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करण्याची आवश्यकता, तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ, नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता, राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रॉमा सेंटर (**Trauma Centre**) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल, तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रॉमा सेंटर (**Trauma Centre**) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(४) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा ठराव क्र. ७**

"उपेक्षित, वंचितांच्या जीवनात समृध्दीचा प्रकाश निर्माण करत सामाजिक न्यायासाठी आयुष्य खर्ची घालणारे, अस्पृश्यीता निवारण आणि स्त्री शिक्षणासाठी संघर्ष करणारे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर "भारतरत्न" या सर्वोच्च उपाधीने सन्मानीत करावे यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनाला करीत आहे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ६ मार्च, २०२५

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा